**महत्वाचे**

**(मनाई आदेश)**

जा.क्र.पोसहआ/कावसु/ ५६८९/२०१८
पोलीस सह-आयुक्त,(का.व.सु), पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक : २३/०८/२०१८

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश ..**

ज्याअर्थी पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर, यांनी अहवालाव्दारे असे कळविले आहे की, पुणे शहरात जनतेच्या मागण्यांसाठी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना या मोर्चे, धरणे, निदर्शने, बंद पुकारणे व उपोषणासारखे आंदोलनाचे आयोजन करतात. शहर परिसरात ठिक-ठिकाणी महानगरपालिकांच्या वतीने अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या कारवाईच्या वेळेस कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचा संभव आहे. **दिनांक १२/०८/२०१८ रोजी श्रावण महिना सुरु झाला असून दिनांक २५/०८/२०१८ रोजी नारळी पोर्णिमा, दिनांक २६/०८/२०१८ रोजी रक्षाबंधन, दिनांक ०२/०९/२०१८ श्री कृष्ण जयंती, दिनांक ०३/०९/२०१८ रोजी गोपाळ काला (दहीहंडी) असून पुणे शहरात विविध ठिकाणी कार्यक्रम होत असतात.** त्या अनुषंगाने पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीकोनातून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३७ (१)(३) चे अंमल जारी करण्यास विनंती केली आहे.

२/- आणि ज्याअर्थी, माझी खात्री झाली आहे की, पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश करणेस पुरेसे व सबळ कारण आहे.

३/- त्याअर्थी, मी **शिवाजी बोडखे,** पोलीस सह-आयुक्त, (का.व.सु) पुणे शहर वर नमूद अ.नं. २ च्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात **दि. २५/०८/२०१८** रोजी **००.०१** वा.पासून ते दिनांक **०७/०९/२०१८** रोजी **२४.००** वा.पर्यंत १४ दिवसांसाठी खालील नमूद केलेली कृत्ये करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

**अ)** कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बरोबर नेणे.

**ब)** दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.

**क)** शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.

**ड)** कोणत्याही इसमाचे चित्राचे,प्रतिकात्मक प्रेताचे,पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.

**इ)** मोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे.

**फ)** यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालीत आहे.

**ग)** ज्यायोगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७(१) व (३) विरूध्द वर्तन करणे.

४/- महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणुक काढणेस बंदी घालीत आहे

५/- जमावबंदीचे आदेश हे लग्नकार्य, धार्मिकविधी, प्रेतयात्रा, सिनेमागृह इत्यादी कारणांकरीता लागू राहणार नाही.

६/- वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही.

७/- सदरचे आदेशाची जाहिररीत्या ठळक प्रसिध्दी करावी.

८/- या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी दिलेला आहे.

ठिकाण :- पुणे शहर